Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 05/08/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**



आपलं महानगर | My महानगर.com

www.mymahanagar.com

# दिनविशेष

## इतिहासाचार्य, नाटककार वासुदेव वामन खरे

वासुदेव वामन खरे उर्फ वासुदेवशास्त्री खरे हे मराठी भाषा इतिहाससंशोधक, कवी व नाटककार होते. त्यांचा जन्म ५ ऑगस्ट १८५८ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर येथे झाला. त्यांचे घराणे संस्कृतज्ञ असल्याने त्यांनी सातारच्या अनंतशास्त्री गजेंद्रगडकरांकडे संस्कृत विद्याभ्यास केला. नंतर पुण्यास येऊन काव्येतिहाससंग्रह या जुन्या ग्रंथांच्या जीर्णोद्धारास वाहिलेल्या मासिकाच्या संपादनकार्यात मदत करू लागले. त्यामुळे त्यांना इतिहास संशोधनाची आवड निर्माण झाली. त्यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर यांनी स्थापिलेल्या 'न्यू इंग्लिश स्कूल' मध्ये काही काळ शिक्षक म्हणून नोकरी केली. त्यानंतर ते मिरजेच्या शाळेत शिक्षक झाले. इतिहास संशोधन हे त्यांचे जीवितकार्य असले, तरी काव्य-नाटकादी साहित्यरचनाही त्यांनी केली आहे.

पंडिती काव्यरचनेची आणि शीघ्रकवित्वाची आवड त्यांना विद्यार्थिदशेपासूनच होती. त्यांनी स्वत:ही काव्यरचना केली आहे. समुद्र (१८८४), यशवंतराय महाकाव्य (१८८८) आणि फुटकळ चुटके (१८९०) हे त्यांचे काव्यग्रंथ. शिवाजी-संभाजी या पितापुत्रांच्या संबंधांवर लिहिलेले गुणोत्कर्ष (१८८५) हे त्यांचे पहिले नाटक. तारामंडळ (१९१४), चित्रवंचना (१९१७), शिवसंभव (१९१९), उग्रमंगल (१९२२) आणि देशकंटक (१९३०) ही त्यांची काही नाटके. नाना फडणविसांचे चरित्र (१८९२) हे इतिहासक्षेत्रातील त्यांचे पहिले पुस्तक. त्यानंतर संशोधन-संपादन प्रकाशनाचा प्रचंड उद्योग त्यांनी केला. १८९७ मध्ये ऐतिहासिक-लेख-संग्रह हे मासिक काढून ते तीन वर्षे चालविले. अधिकारयोग अथवा नानास राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास (१९०८), इचलकरंजी संस्थानचा इतिहास (१९१३), मालोजी व शहाजी (१९२०), मराठी राज्याचा उत्तरार्ध (खंड पहिला, १९२७) ही त्यांची इतर ग्रंथरचना. यांशिवाय हरिवंशाची बखर अथवा पटवर्धन सरदारांच्या हकिकती (१९०९) या ग्रंथाचे संपादन त्यांनी केले आहे. वासुदेवशास्त्री खरे यांचे ११ जून १९२४ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Aug 05, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401